भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक १०.०२.२०२१ ते १४.०२.२०२१)

| अंक १२/२०२१ | | | | | | | दिनांक ०९.०२.२०२१ | | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०२/०२/२०२१ ते ०८/०२/२०२१ पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता १०.०२.२०२१ ते १४.०२.२०२१ पर्यंत) | | | | |
| ०२/०२ | ०३/०२ | ०४/०२ | ०५/०२ | ०६/०२ | ०७/०२ | ०८/०२ | दिनांक | | १०/०२ | ११/०२ | १२/०२ | १३/०२ | १४/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | ० | ० | ० | ० | ० |
| ३५.० | ३५.० | ३५.० | ३५.० | ३५.० | ३६.० | ३६.० | कमाल तापमान (अं. से) | | ३७ | ३८ | ३८ | ३७ | ३७ |
| १६.० | १६.० | १६.० | १६.० | १६.० | १५.० | १५.० | किमान तापमान (अं. से) | | १६ | १७ | १८ | १७ | १७ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ० | ३ | ३ | १ | ० |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ९१ | ९० | ९० | ९० | ९१ | ८५ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | | ६० | ६२ | ६२ | ६१ | ६२ |
| ४४ | ४१ | ४२ | ४२ | ३७ | ३४ | ४२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ४६ | ४६ | ४९ | ५० | ५५ |
| ०.९ | १.१ | १.१ | ०.८ | ०.७ | १.० | ०.७ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००७ | ००७ | ००४ | ००५ | ००३ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | ईशान्ये कडे | पुर्वे कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे |
| पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०२०) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२१ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२१ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४८६०.० | ११.६ | ०.० | ०.० |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक १० ते १४ फेब्रुवारी, २०२१ या कालावधी दरम्यान पर्जन्यमान कोरडे राहण्याची शक्यता आहे त्याचबरोबर कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन मात्र आद्रतेमध्ये घट होण्याची शक्यता असून हवामान कोरडे व मुख्यत्वे निरभ्र राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| इशारा | सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पुढील पाच दिवसासाठी प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून पर्जन्यासंबधी कोणताही ईशारा देण्यात आलेला नाही. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता आंब्यामध्ये फळधारणा झालेल्या ठिकाणी कोवळ्या फळांची गळ होण्याची शक्यता आहे. तरी फळगळ टाळुन उत्पन्न वाढविण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारीच्या आकाराची असतांना १ टक्का पोटॅशियम नायट्रेटची तीन वेळा फवारणी करावी. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | फळधारणा झालेल्या आंबा पिकास विस्तारानुसार प्रति झाड १५०-२०० लि.पाणी १५ दिवसाच्या अंतराने द्यावे. |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | पिक निहाय कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | फुलोरा ते फळधारणा | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता पाण्याची उपलब्धता असल्यास फळधारणा झालेल्या झाडांना विस्तारानुसार प्रती झाड १५०-२०० लि. पाणी १५ दिवसांच्या अंतराने द्यावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे आच्छादन द्यावे.<br>थंडीमुळे नविन येणारा मोहोर टाळण्यासाठी जिब्रेलिक ॲसिड ५० पीपीएम (१ ग्रॅम २० लिटर पाण्यात मिसळून) फवारणी प्रथम पुर्ण मोहोर उमललेला असताना व नंतर मोहोरीच्या आकाराची फळे झाल्यावर संपुर्ण झाडावर करावी. जिब्रेलिक ॲसिडची पावडर पाण्यात अविद्राव्य असल्याने प्रथमतः थोडया अल्कोहोलमध्ये विरघळवून नंतर पाण्यात मिसळावी.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता आंब्यामध्ये फळधारणा झालेल्या ठिकाणी कोवळ्या फळांची गळ होण्याची शक्यता आहे. तरी फळगळ टाळुन उत्पन्न वाढविण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारीच्या आकाराची असतांना १ टक्का पोटॅशियम नायट्रेटची तीन वेळा फवारणी करावी.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता आंब्यामध्ये फळधारणा झालेल्या ठिकाणी कोवळ्या फळांची गळ होण्याची शक्यता आहे, ज्या ठिकाणी फळगळ आढळुन आलेली आहे अशा ठिकाणी चौथ्या ते सहाव्या फवारणीपासून २ टक्के युरीया (२० ग्रॅम युरीया/लि. पाणी) किटकनाशकाच्या द्रावणात मिसळुन फवारावे.<br>जिल्हयामध्ये काही ठिकाणी आंबा पिक फुलोरा अवस्थेत आहे. तरी आंबा बागायतदारांनी तुडतुडे, बोंगे खाणा-या अळया व भुरी रोगाचा प्रादुर्भावापासुन दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. आवश्यकता असल्यास त्यांच्या नियंत्रणासाठी २० टक्के क्विनॉलफॉस २० मि.ली. किंवा २० टक्के कार्बारिल पा.मि.भु. २० ग्रॅम किंवा ५० टक्के प्राफेनोफॉस १० मिली + कार्बेन्डेझिम १० ग्रॅम किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारे गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर फवारणी करावी.<br>विदयापीठाच्या शिफारशीनुसार मोहोरलेल्या झाडांना फळगळ कमी होऊन चांगली फळधारणा होण्यासाठी आम्रशक्ती या विद्राव्य अन्नद्रव्याची १ लि. प्रती १९ लि. पाणी याप्रमाणात फवारणी करावी. सदर १९ लि. द्रावण हे चार मोहोरलेल्या झाडांसाठी वापरावे. दुसरी व तिसरी फवारणी फळे वाटाणा व गोटी आकारची असतांना करावी.<br>आंबा मोहोरावर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास नियंत्रणासाठी आवश्यकतेनुसार १% कार्बेन्डाझीम (१० ग्रॅम १० लिटर पाण्यात) या बुरशिनाशकाची फवारणी घ्यावी. |
| काजु | फळधारणा | सध्यपरिस्थितीत काजु पिक हे फळधारणेच्या अवस्थेत आहे. तरी काजुवरील बोंड व बी पोखरणा-या अळींच्या नियंत्रणासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | डायक्लोरोव्हॉस ७६% प्रवाही १० मिलि प्रती १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता काजुच्या मोठया लागत्या कलमांना १५ दिवसाच्या अंतराने १५० - २०० लीटर पाणी प्रति कलम याप्रमाणे द्यावे.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता नवीन लागवड केलेल्या कलमांना पहिल्या २ वर्षात उन्हाळयात ८ दिवसांच्या अंतराने ३० ली. पाणी प्रति कलम याप्रमाणे द्यावे. |
| नारळ | फळधारणा | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता नारळ बागेस ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्याने पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटच्या सहाय्याने १५ ते २० से.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मि.ली. ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस नरसाळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| सुपारी | फळधारणा | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता सुपारी बागेस ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| वायंगणी भात | फुटवे फुटण्याची अवस्था | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता पुर्नलागवड केलेल्या उन्हाळी भात शेतामध्ये सुरुवातीचे ८ ते १० दिवस पाण्याची पातळी २ ते ३ से.मी. ठेवावी. त्यानंतर ५ से.मी. पर्यंत वाढवावी.<br>भात पिकातील तण नियंत्रण करावे. लावणीनंतर एक महिना झालेल्या भात पिकास ४० कि. ग्रॅम प्रती हेक्टर (८७ कि.ग्रॅ. युरीया) याप्रमाणे नत्राचा पहिला हप्ता द्यावा.<br>भातावर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास ट्रायसायक्लॅझोल १० ग्रम किंवा आयसोप्रोथिऑलेन १० मिलि प्रती १० लिटर पाण्यात मिसळुन फवारावे.<br>भातावर पाने गुंडाळ्णारी अळीचा प्रादुर्भाव आढळल्यास नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस २ लिटर किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही ६२५ मिली किंवा लॅमडासायहॅलोथ्रिन ५% प्रवाही २५० मिली प्रति ५०० लिटर पाण्यामध्ये मिसळुन एक हेक्टर क्षेत्रावरती फवारावे. |
| भुईमुग | फुलोरा अवस्था | भुईमुगाचे पीक एक महिन्याचे होऊन त्यास फुले येण्यास सुरुवात झाली असल्यास त्यात निंदणी करुन भर देण्याचे काम हाती घेण्यात यावे. त्यासाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या “स्वस्तीक” या भरणी अवजाराचा वापर करावा.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता भुईमुग पिकाच्या वाढीच्या कालावधीमध्ये पाण्याच्या दोन पाळ्यातील अंतर १५ ते २० दिवस ठेवावे. |
| कुळीथ | फुलोरा ते शेंगा अवस्था | अंगओलीत असल्यास कुळीथाला पाण्याची गरज नसते. परंतु ओलावा कमी असलेल्या जमिनीमध्ये पिकाला फुलो-यात असताना आणि शेंगा पोसण्याच्या काळात पाण्याच्या २ पाळ्या द्याव्यात. गरजेपेक्षा जास्त पाणी दिल्यास पिक फुलो-यात न येता फक्त शाखिय वाढ होत राहते. यासाठी पाण्याचा अति वापर टाळावा.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता व सद्यस्थितीत कुळीथ पिक हे फुलोरा अवस्थेत असल्याने पिकास पाण्याची पहीली पाळी द्यावी, गरजेपेक्षा जास्त पाणी देऊ नये. |
| चवळी | फुलोरा ते शेंगा अवस्था | अंगओलीत असल्यास चवळी पिकाला पाण्याची गरज नसते. परंतु ओलावा कमी असलेल्या जमिनीमध्ये पिकाला फुलो-यात असताना आणि शेंगा पोसण्याच्या काळात पाण्याच्या २ पाळ्या द्याव्यात. गरजेपेक्षा जास्त पाणी दिल्यास पिक फुलो-यात न येता फक्त शाखिय वाढ होत राहते. यासाठी पाण्याचा अति वापर टाळावा.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता व सद्यस्थितीत चवळी पिक हे फुलोरा अवस्थेत असल्याने पिकास पाण्याची पहीली पाळी द्यावी, गरजेपेक्षा जास्त पाणी देऊ नये. |
| कडवा वाल | फुलोरा ते शेंगा अवस्था | पिक फुलो-यात आल्यावर शेंगा पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी मॅलॅथिऑन २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळुन फवारावे.<br>वाल पिकास पिकाच्या वाढीच्या सर्व अवस्थांमध्ये जमिनीमध्ये ओलावा असणे आवश्यक आहे. पिकाला फुलो-यात असताना आणि दाणे भरण्याच्या काळात पाण्याच्या २ पाळ्या द्याव्यात. ज्यादा पाण्यामुळे वालाची शाखिय वाढ होते व उत्पन्न घटते.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात वाढ व आद्रतेमध्ये घट होऊन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता व सद्यस्थितीत कडवा वाल पिक हे फुलोरा अवस्थेत असल्याने पिकास पाण्याची पहीली पाळी द्यावी, गरजेपेक्षा जास्त पाणी देऊ नये. |
| मिरची | फुलोरा ते फळधारणा | मिरचीवर बोकड्या किंवा चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास रोग नियंत्रणासाठी व रोगकारक किडींच्या उदा. फुलकिडे व पाढरी माशींच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर १५ दिवसांनी फोरेट १० कि./हे. द्यावे तसेच डायमिथोएट ३०% प्रवाही १ मिली + गंधक २ ग्रम किंवा मॅन्कोझेब २ ग्रम प्रती लिटर पाण्यात मिसळुन पुर्नलागवडीनंतर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. |
| दुभती जनावरे | - | रात्रीच्या वेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांचे थंडीपासुन योग्य ते संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोणपाटाचे पांघरुन घालावे. |
| कुक्कुटपालन | - | थंडीचे प्रमाण वाढत असल्याने कोंबडयांचे थंडीपासून योग्य ते संरक्षण करावे. रात्रीच्यावेळी कोंबडयांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन पडदे लावावेत. तसेच पिल्लांना पुरेशी ऊष्णता देण्यासाठी विद्युत दिव्यांची व्यवस्था करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.**


| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ओफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |